# पिण्याचे पाणी



पावसाळ्यात ओढ्यांना पाणी येते. पाण्याबरोबर
माती येते. कचरा येतो. पाणी घाण होते.

नदीवर माणसे आंघोळ करतात. गुरे धुतात.
गाड्या, मोटारी धुतात.
पाण्यात घाण मिसळते.
पाणी घाण होते.

पाण्यात जंतू मिसळतात.
घाण पाणी प्यायले तर
घाण, जंतू पोटात जातात.
आजार होतो.

© होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र, मुंबई ४०० ००५
प्रकाशक: इंडियन इंस्टिट्यूट ऑफ एज्युकेशन
पुणे ४११ ०२९

पाणी पिण्यालायक कसे करायचे?
पातेल्यात पाणी झाकून ठेवा.
थोड्यावेळाने पाण्यातली घाण तळाला बसेल.



पाण्यात तुरटीचा खडा फिरवलात तर
पाणी लवकर निवळेल.

निवळलेले पाणी दुसऱ्या भांड्यात अलगद
ओतून घ्या. तळाची घाण ढवळू नका.

पाणी स्वच्छ, दुपदरी फडक्याने गाळा.
फडके नेहमी धुवा म्हणजे -

फडक्यात अडकलेली घाण निघून जाईल.

पाणी भांड्यात भरून ठेवले की –

पाण्यातली माती हळूहळू खाली बसते.



पण जंतू खाली बसत नाहीत.
ते इकडे तिकडे हिंडत असतात.
जंतू डोळ्यांना दिसत नाहीत.
पाणी स्वच्छ आहे असे वाटते.



पाण्यातले जंतू मारले पाहिजेत.
पाणी उकळले की जंतू मरतात.
पाणी पिण्यालायक होते.

गावात साथ आली असेल तर
सगळ्यांनी पाणी उकळून प्यायले
पाहिजे.

## गावात साथ चालू असेल तर (४)



विहिरीत लाल औषध (पोटॅशिअम परमॅंगनेट) टाका.

बादलीभर पाण्यात दोन चमचे औषध टाका.
काठीने औषध नीट ढवळा.
हे पाणी विहिरीत टाका.
पाण्यातले जंतू मरतील.

पावसाळ्यात
पहिले पाणी येते तेव्हांच
पाण्यात औषध टाका.
म्हणजे साथीला आळा बसेल.